# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org Email- roaurangabad.dte@gmail.com

डिजीटाईज्ड कालबध्द सेवा वर्ष - २०१५


**महत्वाचे**

जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१७/२२३१

दिनांक :- 20 JUN 2017

प्रति,

**प्राचार्य,**

शासकीय /अनुदानित/विनाअनुदानित, अभियांत्रिकी , औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये,

शासकीय/अनुदानित/विनाअनुदानित तंत्रनिकेतने, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये,

व पदव्युतर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था

**औरंगाबाद विभाग**

**विषय :- २१ जून हा "आंतरराष्ट्रीय योग दिवस " म्हणुन साजरा करणेबाबत...**

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र.संकीर्ण ३०१६/प्र.क्र.९६/क्रीयुसे १ मंत्रालय मुंबई दिनांक ०८/०६/२०१६

२. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र.२/एनजीसी/योगदिवस/२०१७/६७८ दिनांक १२/०६/२०१७

संयुक्त राष्ट्रसंघाने २१ जून हा **"आंतरराष्ट्रीय योग दिवस"** म्हणून घोषित केलेला असून त्या अनुषंगाने भारत सरकारने निर्देशास अनुसरून २१ जून हा दिवस सर्वत्र साजरा करण्याचे ठरविलेले आहे. २१ जून हा दिवस योग दिवस साजरा करण्यास संदर्भिय शासन निर्णय १ नुसार सुचित केलेले असून सदरील शासन निर्णयाची प्रत सोबत जोडलेली आहे.

या कार्यालयाच्या अधिनस्त येत असलेल्या शासकीय/अनुदानित/विनाअनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र, पदविका/पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था प्रमुख यांना सुचित करण्यात येते की, संदर्भ क्र.०१ मधील शासन निर्णयात नमुद केल्यानुसार आपल्या संस्थेत २१ जून २०१७ हा दिवस योग दिवस म्हणुन साजरा करण्यात यावा. पावसाळा सुरू होण्याची शक्यता असल्यामुळे सदरील नियोजित कार्यक्रमास अडथळा येऊ नये व सहभागी होणा-यांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये यासाठी योग्य ती जागा निवडण्यात यावी जेणेकरून कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी व संस्थेत साजरा करण्यात आलेल्या योग दिवसाचे निवडक फोटो व कार्यवाहीबाबतचा अहवाल या कार्यालयास roaurangabad@dtemaharashtra.gov.in या ई-मेलवर दिनांक २२/०६/२०१७ पर्यंत सादर करण्यात यावा.

**(महेश शिवणकर)**

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. या कार्यालयाच्या प्रोग्रमर यांना प्रत देण्यात येवून सुचित करण्यात येते की, सदरील पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे व शासकीय संस्थेचे प्राचार्य, यांना ई-मेल द्वारे कळविण्यात यावे.